**वि.दि.दा.क्र.१८/२०२३**
**स्वरा वि. रामराव**
**वादी तर्फे सा.क्र.१**
**(नि.क्र.८५)**

**//०८//**

**<u>प्रतिवादी क्रं.१ ते ८ तर्फे श्री.एस.एस.कांबळे वकिल यांच्यामार्फत उर्वरीत उलटतपास शपथेवर सुरु.</u>**

**१५.** मी सन २०२२ पर्यंत नांदले आहे. मी ज्या मिळकतीचे वाटप मागितले आहे त्या मिळकतीची दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली आहे. मी ज्या ज्या प्रतिवादीच्या नावे सदर कागदपत्रे कशी आली हे पाहिले आहे. शाम हा माझा दीर आहे. सन २००४ पासून तो महावितरणमध्ये मिटर लिडर म्हणून काम करतो. रु.१०,०००/- सन २००४ सालापासून आहे याची मला माहिती नाही. ढोरसांगवी गावात विदयुत व्यवस्थापक म्हणून त्याने काम केले आहे. यास माझे सांगणे की, ते रिडींगला जात होते बाकी मला माहिती नाही. सदर घर क्रमांक २४२९ हे दि.०६/०३/२०१८ रोजी रु. ९२,०००/- मोबदल्यास सत्यवान याच्याकडून खरेदी घेतले हे खरे आहे. प्रतिवादी क्रं. ४ ने गट क्रं.२३६ हा रु.२,५०,०००/- ला खरेदी घेतला हे खरे नाही. दि.०१/०६/२०२० रोजी ग्रामपंचायत मिळकत क्रंमाक ४३६ ही सिमाच्या नावे खरेदी घेतली हे खरे आहे. हे खरे की, ती मिळकत हनुमतंची होती त्याच्याकडून सिमाने घेतली. गट क्रं.२४६ ही ४३ गुंठे जमीन लक्ष्मीबाईकडून विकत घेतली यास माझे सांगणे की ती परत घेतली. चंद्रकलाबाई हिच्याकडून गट क्रं.२३६ प्रतिवादींनी खरेदी घेतली हे खरे आहे. गट क्रं.२९७ मधील १८ आर जमीन प्रतिवादींनी सोपानकडून खरेदी घेतली हे खरे नाही.

**१६.** शाम व सिमा यांच्या नावे असलेली मिळकत शामची स्वतच्या पैशातून खरेदी घेतलेली आहे हे म्हणणे खरे नाही. बाकीच्या सर्व जमीनी या प्रतिवादीच्या स्वकष्टार्जीत आहेत हे खरे नाही. घर क्रं.३२६ हा वडीलोपार्जित नाही हे खरे नाही. दि.२९/११/२०१३ पासून शामचे रेशनकार्ड वेगळे आहे याबद्दल मला माहिती नाही. दावामिळकतीपैकी एकही मिळकत वडीलोपार्जित नाही हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, त्यामुळे मला वाटणीचा अधिकार नाही. गट क्रं. २३६ ही आमच्या आर्थिक नडीपोटी आम्ही दुस-याला दिली

होती ती आम्ही सगळयांनी परत मिळविली. ती मिळकत आम्ही सर्वांनी मिळविली असा दाखविणारा दस्त मी हजर करु शकते. हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे. वादी क्रं. १ हिचे हितसंबंध मी व्यवस्थीत प्रदर्शित करते व माझ्या हितात तिचे हित आहे असे मी खोटे सांगते हे खरे नाही. मी प्रतिवादी क्रं.१ विरुध्द भा.दं.वि कलम ४९८ अ प्रमाणे खटला केला आहे व पोटगी अर्ज केला आहे. त्या प्रकरणाची आजची स्थिती मला माहिती नाही. पोटगी अर्जात रामरावची साक्ष होणे बाकी आहे. फौजदारी खटल्यात मी साक्ष देण्यास हजर राहत नाही व रामरावला त्रासच देते हे खरे नाही. तसाच त्रास याही प्रकरणात देण्यासाठी मी हादावा केला आहे हे खरे नाही. हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**